(१३५)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

**४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.**

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/५७३. दिनांक २२ फेब्रुवारी, १९९९

**परिपत्रक क्रमांक -१२.**

विषय : निविदा स्वीकृतीचे अधिकार.

संदर्भ : १) दि.२१.६.९१ चे परिपत्रक क्र.मपापुवजनिमं/विशा-३/डेपॉ/५३३/९१.
२) दि.३.२.९८ चे परिपत्रक क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३३३.
३) दि.२.३.९८ चे परिपत्रक क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/६३०.
४) दि.१९.१२.९८ चे परिपत्रक क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/४४१७.

वरील संदर्भीय परिपत्रकांनुसार रु.२५० लाखावरील व रु.५०० लाख किंमतीपर्यंतच्या सर्व निविदांच्या छाननीसाठी संबंधित मुख्य अभियंता, अन्य अेक प्रादेशिक मुख्य अभियंता व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या समितीचे गठन केले आहे.

वरील समितीच्या शिफारशीनंतर रु.२५० लाखावरील व रु.५०० लाखापर्यंतच्या ज्या निविदांसाठीचे देकार चालू दरसूचीनुसार येणा-या कामांच्या किंमती अितके किंवा त्यापेक्षा कमी आहेत, अशा निविदा स्वीकृतीचे अधिकार विशेष कार्य अधिकारी अथवा सदस्य सचिव (तांत्रिक) यांना आहेत.

परंतु रु.२५० लाखावरील व रु.५०० लाखापर्यंत, ज्या निविदांचे देकार चालू दरसूचीनुसार येणा-या किंमतीपेक्षा जास्त आहेत अशा निविदा स्वीकृतीचे अधिकार प्राधिकरणाच्या निविदा समितीस असल्याने व असे प्रस्ताव हे संबंधित मुख्य अभियंता, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाअधिकारी आणि विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता ( जेथे लागू असेल तेथे) यांचे शिफारशीनंतर सदस्य सचिव (तांत्रिक) यांचे शिफारशीसह निविदा समितीपुढे सादर होत असल्याने अशा प्रकरणी संदर्भीय परिपत्रकात अुल्लेख केलेल्या समितीच्या शिफारशीची आवश्यकता नाही. यापुढे अशा निविदांचे प्रस्ताव संबंधित मुख्य अभियंता छाननी करुन वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी व विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता (जेथे लागू असेल तेथे) सदस्य सचिव (तांत्रिक) यांना सादर करतील व त्यानंतर ते प्रस्ताव कार्यक्रम बाबीव्दारे प्राधिकरणाच्या निविदा समितीमध्ये निर्णयार्थ सादर करण्यात येतील.

सर्व संबंधितांनी वरील बदलाची नोंद घ्यावी.

वरील निर्णय या परिपत्रकाच्या दिनांकापासून लागू राहील.

(राजेंद्र सगणे )
**सदस्य सचिव (तांत्रिक)**

प्रत :
मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अुपाध्यक्ष.
मा.राज्यमंत्री, नगरविकास, तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अुपाध्यक्ष.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबअी.
प्राधिकरणाचे सदस्य (सर्व)
सदस्य सचिव (प्रशासन), म.जी.प्रा.मुंबअी-२१
विशेष कार्य अधिकारी तथा मुख्य अभियंता, म.जी.प्रा.नवीन मुंबअी.
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, म.जी.प्रा.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाअधिकारी, म.जी.प्रा.नवीन मुंबअी.
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.मंडळ.
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.बांधकाम विभाग.